# उदयास्त

## पेशवेकालीन सरदार पटवर्धन यांच्या पराक्रमाचा व संघर्षमय जीवनाचा अभ्यासपूर्ण परिचय

लेखिका

**सौ. स्मिता दामले**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

A127

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**उदयास्त : सौ. स्मिता दामले**
© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
नोव्हेंबर, २०१३

**किंमत**
₹ २९०/-

उदयास्त

## प्रस्तावना....

''उदयास्त'' ही कहाणी आहे हरभट पटवर्धनांच्या घराण्यातील पराक्रमी पुरुषांची.

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्र राज्याची स्थापना करून या देशी सुवर्णकाल निर्माण केला. त्यांच्या नेतृत्वाखाली चारी वर्णातील अनेक धडाडीच्या तरुणांनी आपापले पारंपरिक व्यवसाय टाकून हाती तलवार धरली आणि क्षात्रधर्म स्वीकारला. त्यांच्यानंतर संभाजीराजे गादीवर आले. शिवाजीमहाराज असेपर्यंत महाराष्ट्रात पाऊल न टाकणारा औरंगजेब बादशहा आपल्या प्रचंड फौजेसह दख्खनवर उतरला. संभाजीराजांनी आपल्या वीरवृत्तीला आवाहन करत औरंगजेबाशी आणि त्याच्या अफाट सेनेशी टक्कर दिली. नऊ वर्षे मराठी जनतेनं संरक्षण केलं. त्यांच्या अटकेनं अवघा देश हादरला. मृत्यूशीही झगडा करत आपल्या वीरशक्तीला साजेसं, संभाजीराजांनी वीरमरण पत्करलं.

संभाजीराजांच्या जाण्यानंतर रायगड बादशहाच्या ताब्यात गेला. त्यामुळे येसूबाई आणि त्यांचा सात वर्षाचा बालकपुत्र शाहू औरंगजेबाच्या कैदेत पडले. राजाराममहाराज गादीवर आले; पण त्यांनीही औरंगजेबाच्या कारवायांशी खडतरपणे तोंड देत सिंहगडावर देह ठेवला. त्यानंतर ताराराणींनी आपल्या सरदारांसह कडवी झुंज दिली आणि महाराष्ट्राची शान राखली. औरंगजेबाचं दक्षिणेज सत्ता मिळवण्याचं स्वप्न धुळीला मिळवलं.

इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर राजकारणाची समीकरणे बदलली. दिल्लीचं तख्त काबीज करण्याचं लक्ष्य साध्य करण्यासाठी औरंगजेबाच्या पुत्रांनी मराठ्यांपासून स्वत:ला वाचवण्यासाठी आपल्या कैदेत असलेल्या शाहूराजांची सुटका केली आणि महाराष्ट्रात भांडणांची बीजं पेरली.

शाहूराजे सुटकेनंतर स्वराज्यात आले. मोंगलांच्या अपेक्षेप्रमाणे ताराराणींनी त्यांना अटकाव करून संघर्षाची ठिणगी पेटवली. शाहूराजे बालपणापासून औरंगजेबाच्या नजरकैदेत वाढलेले होते. ना युध्दशास्त्राचं शिक्षण ना राज्यशास्त्राचं. पूर्वजांचे पराक्रम पाहण्याचं भाग्यही त्यांना लाभलं नाही. बालवयापासून पंचवीस वर्षे पाय बांधून ठेवलेल्या युवकाला पाय मोकळे करून पळायला सांगितले तर जी अवस्था होते तीच अवस्था शाहूराजांची स्वराज्यात आल्यावर होती. स्वराज्यात त्यांचे आप्तच त्यांच्याविरुध्द उभे ठाकले; पण त्यांच्या मनाची उमेद कमकुवत नव्हती. त्यांनी स्वत:तली ही उणीव, योग्य माणसांना चाकरीत ठेवून भरून काढून त्रेचाळीस वर्षे राज्य केलं. मोगलशाही मोडकळीला आली होती आणि हाताशी बाजीरावासारखे रणधुरंधर होते तरीही दिल्ली काबीज केली नाही. त्याला कारण त्यांची मानसिकता; पण मोंगलांकडून निजामसारखा डसत होता. त्याच्या हाती राज्यही जाऊ दिलं नाही. उलट बाळाजी विश्वनाथांच्या काळात स्वराज्याची सीमारेषा मात्र उत्तर-दक्षिणेला लांबवर खेचली. त्यांच्या काळातच पेशवे घराण्याचा उदय झाला. शाहूराजांच्या हयातीतच बाळाजी विश्वनाथ, त्यांचे पुत्र बाजीराव आणि बाजीरावांचे पुत्र बाळाजी बाजीराव-नानासाहेब पेशवेपदी बसले. शिवरायांच्या कालापासून राजकारणात असलेल्या सासवडच्या पुरंदऱ्यांची त्यांना साथ मिळाली.

मेलुकोटेच्या धिप्पाड पर्वतराजी पाहिल्या तेव्हा मराठ्यांच्या फौजा हैदरशी लढायला किती अडचणीच्या जागेत शिरल्या होत्या ते लक्षात आलं. जिथे परशुरामभाऊंचा करुण मृत्यू झाला, त्या कोल्हापूरजवळील पट्टणकुडीच्या माळरानावर गेल्यावर परशुरामभाऊ आणि कोल्हापूरकरांशी झालेल्या लढाईचा अंदाज आला.

माझ्या प्रबंधावर आधारित कादंबरीच्या स्वरूपातील हे कथन आहे. पटवर्धनांच्या घरात घडामोडी घडत असताना इतर राजकीय हालचाली काय काय घडत होत्या, आणि ज्यांचा विश्वास गोविंद हरी आणि गोपाळरावांनी मिळवला होता ते कर्तव्य कठोर, नि:स्पृह थोरले माधवराव पेशवे, यांचा राजकारणावर काय प्रभाव आणि वचक होता त्याची ओळख व्हावी म्हणून

समांतराने माधवरावांचेही चारित्र्य रेखाटले आहे. परशुरामभाऊ आणि चिंतामण आपा यांच्या कारकिर्दीचा मात्र विस्तारभयास्तव यात समावेश नाही.

ह्या कादंबरी लेखनापूर्वी सांगलीचे हिज हायनेस रा. रा. विजयसिंहराजे पटवर्धन यांची भेट घेतली. त्यांनी ज्या ममतेने आणि आपुलकीने मदतीचा हात पुढे केला त्यासाठी शब्द अपुरे आहेत. तो दिवस आम्हाला अविस्मरणीय आनंदाची ठेव ठरला आहे.

पटवर्धन घराण्याच्या उदयाची, शिखरास पोचण्याची आणि विलयास जाण्याची ही कहाणी आता वाचकांसमोर ठेवली आहे.

✦

सूर्य अगदी माथ्यावर आल्याची वेळ होती. त्याची दाहक किरणं पावसाच्या सरळसोट धारेसारखी उतरत्या डोंगराच्या उघड्या, काळ्या कुळकुळीत छातीवर पडली होती. कर्तृत्व सूर्याचं पण लोक दोष देत होते ग्रीष्माला! समुद्रावरून येणारं वारंही अजून सुरू झालं नव्हतं. आणि जमिनीवरचं वारंही ठप्प झालं होतं. हबशाच्या कांतीसारखे दिसणारे सह्याद्रीचे काळे कुळकुळीत कातळ सूर्यस्नान करीत बसले होते. आंबा, फणस, डंवरलेल्या वृक्षशाखांनी घरादारांवर, पाऊल-वाटांवर सावली पसरली होती. भूमीच्या अंगावर उमटलेली हिरव्यागार गवताची दाट, मऊ लव उन्हाच्या तडाख्यात वाळून, कोरडी होऊन चुरगळून गेली होती. मऊदाट केसातून जाणाऱ्या भांगोळ्यासारख्या उतरणीवरच्या मळलेल्या पाऊलवाटा लाल-केशरी मातीतून उठून दिसत होत्या. घामाच्या धारा लागलेली माणसं कावून गेली होती.

डोक्यावर एरंडाचं पान पंचाखाली ठेवून घामाच्या धारा पुसत बाळंभट चुटचूट पावलं टाकीत घराकडे चालले होते. गावातलं मानाचं घर म्हणजे सहस्रबुद्धे खोतांचं! त्यांच्या घरची पूजा आटोपून, परांजप्यांच्या घरी वैशाखातला मुहूर्त काढून देऊन घराची वाट धरेपर्यंत उशीर झाला होता. आज दोन्ही घरात नैवेद्याच्या वाटीभर दुधाशिवाय पोटात काही गेलं नव्हतं.

चैत्र सुरू झाला की बाळंभटांना सुगीच्या दिवसांची चाहूल लागायची. संपूर्ण महिनाभर काही ना काही सण, वैशाखात लग्न, ज्येष्ठात व्रतवैकल्य, आणि श्रावणात तर नारळ, तांदूळ, सुपाऱ्या, दक्षिणा, पैसे, धोतरजोड्यांची वर्षाची बेगमी व्हायचे सुगीचे दिवस. घरात तेच मोठे. त्यामुळे धाकटे बंधू रघू आणि कृष्णंभट आणि आपले तीन मुलगे हरी, केशव, विठ्ठल यांना घेऊन संसाराचा गाडा चालवताना जीव कावून जायचा. म्हणून हरीला हाताशी धरण्याचं त्यांचं स्वप्न होतं. तेवढंच पिठाला मीठ.

आता आपला मार्ग आपणच शोधू. जन्माला घातलंय तर आपल्या उदरभरणाचा प्रश्न तरी नक्की सोडवला असेल त्या नियंत्याने. घालू त्यालाच साकडं...निदान ह्या घरातल्यांवरचं आपलं ओझं तरी कमी होईल. पण जायचं तरी कुठे? कुणाकडे? सकाळच्या अपमानाच्या आठवणीने हरीचे डोळे भरून आले. सर्वांच्या समोर वडील आपल्याला रागे भरले. नकोच राहायला आपण या घरात!

विचार करता करता हरीला गाढ झोप लागली. पहाटे केशवाच्या आणि विठोबाच्या घोकंपट्टीने जाग आली. त्यांचं ते लयीतलं मंत्रोच्चारण हरीच्या कानावर पडत होतं. पक्ष्यांची किलबिल कानी पडत होती. खूप प्रसन्न वाटत होतं; पण तो तसाच पडून राहिला.

सकाळी, कालचा राग तीर्थरूप विसरले होते हे त्याच्या लगेच लक्षात आलं. घरातला दिवस नेहमीसारखाच सुरू झाला. वरून शांत, थंड दिसणाऱ्या हरीच्या मनात मात्र वादळ घोंघावतंय याची कुणालाही कल्पना नव्हती.

हरीच्या मनाला मात्र एकच ध्यास लागला होता. घर सोडायचं. देवाच्या चरणांशी आसरा घ्यायचा. आपलं चांगलं वाईट करायची जबाबदारी त्याच्यावरच सोपवायची. देवळातला प्रसाद खाऊन राहिलं तर निदान नानांचा आपल्याला जेवायला घालायचा भार तरी कमी होणार होता. कुठे जावं ते मात्र कळत नव्हतं.

उन्हं चढायला लागली. समुद्राचा खारा वारा झुळुकीच्या रूपानं घराघरात शिरायला लागला. चुलीतली लाकडं मागे पुढे करत हरीची आई म्हणाली,

''वारा विंझायला लागला ग बाई आपला गणराया! पाऊसही आण रे बाबा लवकर यंदा!''

''कुठला गणराया आई?'' केशवाने मधेच विचारलं.

''तोच आपला कर्ता, करविता, विघ्नहर्ता गणोबा! पुळ्याचा. समुद्राच्या किनाऱ्यावर वस्तीला आहे तो!'' आईने हसत म्हटलं. हरीच्या कानावर ते शब्द